## प्रेसनोट दि.२२/०३/२०१९

## डेक्कन पोलीस स्टेशन पुणे शहर

दिनांक २१/०३/२०१९ रोजी पोलीस नाईक ११६९ चव्हाण व पोलीस शिपाई ९९६७ शिंदे यांना प्रभात बीट मार्शल दिवसपाळी ड्युटी असताना दुपारी १५/३० वाजता एक ७ वर्षाचा लहान मुलगा त्याच्या आजीचा हात सोडुन प्रभात रोडवर पळुन गेल्याबद्दल नियंत्रण कक्षाकडुन कॉल प्राप्त झाल्याने प्रभात बीट मार्शल वरील कर्मचा-यांनी प्रभात रोडवरील गल्ल्या चेक करुन लहान मुलास शोधुन काढले. कॉलर यांना कॉल करुन लहान मुलगा चिन्मय घाडगे,वय-०७ वर्षे यांस त्याचे आजी जयश्री नारायणे वय-६२ वर्षे यांचे ताब्यात देण्यात आले आहे. जयश्री नारायणे यांनी प्रभात बीट मार्शलचे कर्मचारी यांनी तात्काळ मदत करुन आपले नातवास सुखरुप ताब्यात दिल्याबद्दल आभार मानले आहेत.